**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

४. माझे १९९६ साली बारावीचे शिक्षण झाले असून त्यावेळी माझे वय १८ वर्षे होते. मला सज्ञान झाल्यानंतर समजायला लागले होते. मी संतू विठू केसरकर यांना पाहिलेले नाही. मी येसूबाई संतू केसरकर यांना पाहिलेले असून त्या मयत आहेत. मला त्या कधी मयत झाल्या याबाबत सांगता येणार नाही. मृत्यूसमयी साधारणतः त्यांचे वय ८० ते ८५ वर्ष असावे.

५. मी प्रतिवादी क्र.१ च्या आई–वडिलांना पाहिलेले आहे. प्रतिवादी क्र.१ चे आई–वडिल त्यांच्या लग्नापासून येसूबाई सोबत राहत होते. मला त्यांना संतू व येसूबाईने त्यांच्या लग्नापासून ठेवून घेतल्याची माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ चे आई–वडिल येसूबाई व संतू सोबत राहून त्यांच्या घराण्याची शेती करत होते. मला वादी क्र.१ चे केव्हा लग्न झाले याबाबत माहिती नाही. वादी क्र.१ लग्नापासून पतीसोबत हेब्बाळ–जलद्याळ येथे राहते. किणे ते हेब्बाळ–जलद्याळ हे अंतर १५ कि.मी. आहे.

६. मला गावातील मसणू सुतार, मोतीराम केसरकर, परसू सलामवाडे आणि भागोजी पताडे यांच्या बाबत माहिती आहे. ते गावातील प्रतिष्ठीत लोक असून पंच म्हणून काम करतात. ते गावातील भाऊबंदकीचे वाद सोडविण्याचे तसेच लग्न ठरवण्यासाठी मध्यस्थी करत होते. मला वरील लोकांनी वादी क्र.१ चे लग्न ठरविण्यास मध्यस्थी केल्याची माहिती नाही. मी दावा शेत मिळकतींचे आणि घर मिळकतींचे उतारे पाहिलेले नाहीत.

७. माझ्या वडिलांचे नावे विष्णू तुकाराम पाटील असून ते वाघराळी, ता. गडहिंग्लज येथील कायमचे रहिवासी होते. साक्षीदार सांगतो, त्याचे वडिल किणे येथे स्थलांतरीत झाल्यापासून तेथील रहिवासी आहेत. आमच्या वडिलांची वाघराळी येथे घर व शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, किणे येथे माझ्या वडिलांची शेती नाही. माझ्या वडिलांनी सन २००१ मध्ये किणे येथे जमीन खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचा सदर जमीन खरेदीनंतर सन २००१ पासून किणे गावाशी संबंध आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००१ पासून मी वडिलांसोबत किणे येथे राहत आहे.

८. मला दावा घर मिळकतींचे क्रमांक सांगता येणार नाहीत. सदर मिळकतींचे अंदाजे क्षेत्र ९०० व ७०० चौ.मी. आहे. मला आमच्या गावात सिटी सर्वे झाल्याची माहिती नाही.

मी माझ्या पाहण्यावरुन दावा घरांचे अंदाजे क्षेत्र सांगितले आहे. मला प्रतिवादी क्र.१ ने केव्हा खरेदी केली याची वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर खरेदीवेळी कोण- कोण हजर होते व कोण साक्षीदार होते याबाबत माहिती नाही. मला त्यांच्यातील सदर व्यवहाराच्या रकमेबाबत माहिती नाही. मला खरेदीवरुन प्रतिवादी क्र.१ च्या नावाची कधी नोंद झाली याबाबत माहिती नाही.

९. मला दाव्यातील सर्व शेतजमिनींचे गट क्रमांक सांगता येणार नाहीत. मला त्यातील गट क्र.२४७ व ९५ बाबत माहिती आहे. सदर दावा नऊ शेतजमिनींसाठी करण्यात आलेला आहे. मला प्रत्येक जमिनीचे क्षेत्र सांगता येणार नाही. मी सहा महिन्यांपूर्वी गट क्र.२४७ व ९५ चे ७/१२ उतारे पाहिले होते. सदर जमिनी माझ्या शेजारी असल्यामुळे मी माझ्या जमिनीचे उतारे काढले असता, त्याबाबत पाहिले होते.

**१०**. गट क्र.२४७ च्या पुर्वेला आप्पा केसरकर यांची जमीन, पश्चिमेला गोविंद केसरकर यांची जमीन, उत्तरेला व दक्षिणेला नारायण शेंदरकर यांची जमीन आहे. गट क्र.९५ च्या पुर्वेला नारायण निंगू शेंदरकर यांची जमीन, पश्चिमेला शंकर पताडे यांची जमीन, उत्तरेला राजाराम केसरकर यांची जमीन आणि दक्षिणेला अर्जुन तुप्पट यांची जमीन आहे. गट क्र.९५ च्या शेजारी माझी गट क्र.२७६ ची जमीन असून ती माझी मयत आजी धोंडूबाई परसू केसरकरच्या नावावर आहे. माझ्या आजीला दोन मुले आहेत.

**११**. गट क्र.२४७ च्या शेजारी माझ्या आईच्या नावे गट क्र.२७९ ची जमीन आहे. मी आमच्या जमिनीचे उतारे हजर करु शकतो. मी पाहिलेल्या गट क्र.२४७ आणि ९५ च्या उता-यांवरती प्रतिवादी क्र.१ चे नाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती प्रतिवादी क्र.१ कसत आहे. प्रत्येक वर्षी तलाठी पाहणी करुन उता-यातील पिकपाहणीच्या नोंदी घेत असतो.

**१२**. माझे वादी क्र.१ व तिच्या पतीसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला दारुचे व्यसन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पैसे घेऊन गावातील कोणासाठीही साक्ष देतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ च्या पतीने मला साक्ष देण्यासाठी बोलाविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत वादीची प्रतिवादींसोबत वहिवाट असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला काहीही माहिती नसताना मी

प्रतिवादी क्र.१ ने खोटे खरेदीपत्र करुन घेतल्याचे सांगत आहे. मला माझ्या समजूतीप्रमाणे खरेदीपत्रा वरती वारसांची स्वाक्षरी लागते याची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही माहिती नसताना वादीला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २४.०२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.